**अर्जदारातर्फे नामे शिवाजी भानुदास कातोरे याचा उलटतपास सामनेवाले तर्फे ॲड. श्री. टी. बी. ढोकणे यांच्यामार्फत शपथेवर सुरु –**

१. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील भानुदास गोविंद कातोरे हे दिनांक १२.०८.२०१४ रोजी मयत झाले. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांना मी तसेच आई नर्मदा व बहिणी सिंधूबाई, इंदूबाई, बेबी व निता असे वारस आहोत. हे म्हणणे खरे आहे की, आई व बहिणी हिंडूफिरू शकतात. हे म्हणणे खरे नाही की, रे.मु.नं. ४०२/२००९ या दाव्यामध्ये माझे वडील दिनांक ०२.०२.२०११ पासून हजर राहिले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे दिनांक १९.०१.२०१३ रोजी न्यायालयाने तो दावा बंद केला. हे म्हणणे खरे आहे की, त्या दाव्याचे काम माझे वडील पाहात होते.

२. हे म्हणणे खरे आहे की, तो दावा पुर्नफैलावर घेण्याकरिता मी एकट्याने मुखत्यार म्हणून दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १४/२०१३ दाखल केला होता. मुखत्यार पत्र कधी रद्द होते हे मला माहित नाही. हे मी सांगू शकत नाही की, माझे वडील दिनांक १२.०८.२०१४ रोजी मयत झाल्यानंतर ते मुखत्यार पत्र रद्द झाले. हे म्हणणे खरे आहे की, किरकोळ अर्ज क्र. १४/२०१३ मध्ये वारस रेकॉर्डवर घेण्याचा अर्ज मी, माझी आई व बहिणी अशा सर्वांनी दिला होता. त्या अर्जाप्रमाणे वारस रेकॉर्डवर घेतले नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे आम्ही दुरूस्ती करून वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी परवानगी अर्ज दाखल केला होता, तो अर्ज न्यायालयाने दिनांक ०५.०३.२०२२ रोजी रद्द केला. हे म्हणणे खरे आहे की, त्या आदेशावर मी आजपर्यंत वरीष्ठ न्यायालयात दाद मागितलेली नाही. हे म्हणणे खरे आहे

की, त्यामुळे दिनांक ०५.०३.२०२२ पासून आम्हाला किरकोळ अर्ज क्र. १४/२०१३ भाग घेण्याचा अधिकार राहिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, किरकोळ अर्ज क्र. १४/२०१३ हा न्यायालयाने रद्द केलेला नाही.

३. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील मजकूर की, “सदरचा अर्ज माझे वडील भानुदास कातोरे यांनी सामनेवाला विरुध्द नेवासा कोर्टातील डिले चौकशी अर्ज नंबर १४/२०१३ चा अर्ज पुन्हा फैलावर घेण्यासाठी दाखल केला आहे” हा खोटा मजकूर लिहिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील मजकूर की, “परंतु, त्या दाव्यातील वादीचे वडील कावीळ आजाराने गंभीर आजारी असल्याने वादीस तारखेस कोर्टात हजर राहून दाव्याचे काम पाहणे शक्य झाले नाही” हा खोटा मजकूर लिहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या शपथपत्रातील पान क्र. २ वरील कलम २ व ३ मधील वादी हा शब्द मुळ अर्जात नमुद नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही दिनांक २२.११.२०२२ ते १०.१२.२०२२ या कालावधीमध्ये देवदर्शनाला गेल्याचा कोणताही पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत अर्जाच्या कामकाजासाठी माझी आई व बहिणी न्यायालयात येवू शकल्या असत्या. हे म्हणणे खरे आहे की, रे.मु.नं. ४०२/२००९ या दाव्याशी माझा काहीही संबंध नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रामधील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या अर्जातील विनंती कायदेशीर नसून खोटी आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत

अर्ज दाखल करण्याचा मला अधिकार नाही. रे.मु.नं. ४०२/२००९ हा दावा रद्द झाल्यानंतर त्याला पुर्नफैलावर घेण्याकरिता कारण घडले. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत अर्जास कोणतेही कारण घडले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाले यांना त्रास देण्यासाठी खोटा अर्ज दाखल करून खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

**स्वाक्षरीत**/-

(**श्रीमती संध्या यु. सुळ**)

दिनांक–१४/११/२०२५.

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

नेवासा